हट्टी गाढव


मराठी अनुवाद: सुशील मेन्सन





कोणे एके काळी एक गाढव होते. ते एका जुनाट तबेल्यात एकटेच राहात होते. ते एक सभ्य आणि दयाळू गाढव होते. ते नेहमी प्रसन्नचित्त असे. त्याच्या चेहऱ्यावर सतत आनंदी हास्य दिसत असे. त्याचे डोळे खूप सुंदर होते, कान लांब आणि टोकदार होते, अंगावरचे केस रेशमासारखे मुलायम होते.

गाढव उंच उंच पर्वतांनी वेढलेल्या एका छान उबदार गावात राहात होते. त्याचे मालक एक श्रीमंत व्यापारी होते. पर्वतातील गावातून दरीत वसलेल्या शहरात त्यांचे सतत येणे-जाणे असे. या शहरात सगळे व्यापारी आपला माल विकण्यासाठी परस्परांना भेटत. त्यामुळे लहानशा गाढवाला पाठीवर ओझे घेऊन कित्येक मैल चालावे लागे. पण ते विनातक्रार हे काम करत असे. स्वभावाने ते खूप साधेसरळ होते.



गाढवाचा मालक खूप लठ्ठ आणि ठेंगणा होता. तो नेहमी रंगीबेरंगी कपडे घालत असे. पण त्याचा चेहरा सतत चिडका दिसत असे. त्यामुळे लोक त्याला *चिडका-जाड्या* म्हणत.

चिडका-जाड्या मालकाने आपल्या गाढवाला राहायला एक जुनाट तबेला दिला होता. त्याला खायलाप्यायला तो भरपूर चारा–पाणी देत असे. पण त्याने आपल्या गाढवाचे ना कधी नाव ठेवले, ना कधी त्याचे कौतुक केले.



एकदा चिडका-जाड्या मालक सुंदर सुंदर गालिचे, उत्तम प्रतीचे रेशीम आणि मातीची दोन मोठी भांडी विकायला पर्वतातील दुसऱ्या गावात जाऊ लागला. त्याने मातीची भांडी गाढवाच्या दोन बाजूंना टांगली, गालिच्यांची घडी गाढवाच्या पाठीवर लादली आणि रेशमाची मोठी गुंडाळी गाढवाच्या डोक्यामागे बांधली.




पर्वतावर चढता-उतरताना गाढव धापा टाकू लागले. त्याच्यावर लादलेला माल खूप जड होता. दर क्षणाला त्याची गती मंद होऊ लागली. पण त्याने काही तक्रार केली नाही.



शेवटी मालक त्याला म्हणाला, “थांब गाढवा, मी खूप थकलोय, तुझ्या पाठीवर बसतो, मग आपण ती पुढची टेकडी चढून जाऊ.” गाढवाने उसासा टाकला.

मालक पाठीवर चढून बसल्यावर गाढव दुडक्या चालीने चालू लागले, पण पूर्वीपेक्षा आणखी सावकाशीने! स्वतःच्याच सामानावर बसलेला आपला चिडका-जाड्या मालक किती मजेशीर दिसत असेल, असा विचार गाढवाच्या मनात आला आणि ते स्वतःशीच हसू लागले.



पर्वतामध्ये वसलेल्या गावात खूप घाई-गडबड दिसत होती. बाजारात व्यापारी आपला माल रंगीबेरंगी स्टँडवर ठेवण्यात गुंतले होते. गावात एक सर्कससुद्धा आली होती. सर्कसचा तंबू गावाबाहेर उभारत होते. चिडका-जाड्या मालक आणि गाढव तिथे आले. गावचे लहान-सहान रस्ते पुरुष, स्त्रिया आणि मुलांनी फुलून गेले होते.



मालक आणि गाढव गावच्या बाजारात प्रवेश करू शकले नाहीत. म्हणून, मालकाने आपले गालिचे, रेशीम आणि भांडी सर्कसच्या तंबूजवळच मांडली.





मालकाने गाढवाला सर्कसच्या तंबूच्या प्रवेशद्वाराजवळ बांधले. थोड्याच वेळात त्याचा सारा माल विकला गेला. मग आपली पैशाने भरलेली पिशवी घेऊन, गाढवाला तिथेच सोडून तो बाजारात गेला. तिथे त्याला काही वस्तू खरेदी करायच्या होत्या.

जाण्याआधी तो गाढवाला म्हणाला, “तुझ्यासाठी खायला ओट आणि पाणी ठेवलंय. मी संध्याकाळी परतेन.” गाढवाच्या पाठीवर साधी मायेची थाप मारण्याची तसदीदेखील त्याने घेतली नाही.



दीर्घ प्रवासाने गाढव पुरते थकून गेले होते. थोड्याच वेळात त्याला डुलकी लागली. सर्कसमधील जनावरे तंबूबाहेर त्यांच्या सकाळच्या खेळाची तयारी करत होते. नृत्य सादरीकरण करण्यासाठी एक झेब्रा तंबूत जाऊ लागला. डुलक्या काढत असलेल्या गाढवाला पाहून तो म्हणाला, “किती बावळट दिसतोय हा घोडा!”



झेब्राचे बोलणे ऐकून गाढवाने मान वर केली आणि म्हणाले, “मी गाढव आहे, घोडा नाही.”

झेब्रा गाढवाच्या निकट आला. त्याने गाढवाला न्याहाळाले आणि म्हणाला, “गाढव! काय करतोस तू?”

“मी पाठीवर सामान लादून डोंगर चढतो-उतरतो.”

“पाठीवर सामान लादतोस! कशासाठी?” आश्चर्याने झेब्राने विचारले.

“माझ्या मालकासाठी, श्रीयुत चिडका-जाड्यासाठी,” गाढव खट्याळपणे उत्तरले.






"असं असं, मग तुझा मालक तुला चांगलीच बक्षीसी देत असेल," झेब्रा म्हणाला.

"बक्षीसी! मी समजलो नाही," गोंधळून गाढवाने विचारले.

"अरे, म्हणजे तुझा मालक तुला चांगलंचुंगलं अन्न खाऊ घालत असेल, रात्री तुझ्या अंगावर उबदार ब्लँकेट पांघरत असेल, तुझ्या गळ्यात छानछान फित घालत असेल आणि हो, भरपूर मायासुद्धा करत असेल तुझ्यावर."

गाढव आश्चर्यचकीत झाले. या साऱ्या गोष्टी त्याला अद्भुत वाटल्या.




"मी काय बोललो हे समजण्याएवढा तू शहाणा नाहीस, असं दिसतं. शेवटी तू काही झेब्रा नाहीस," झेब्रा म्हणाला. एवढे बोलून झेब्राने सर्कसच्या तंबूत प्रवेश केला आणि तिथे वाजत असलेल्या संगीतावर तो नृत्य करू लागला.



नृत्य संपताना झेब्रा गोलगोल फिरला आणि आपल्या मागच्या पायांवर उभा राहीला. तसाच चालत तो तंबूबाहेर आला. रिंगमास्टरने त्याच्या पाठीवर छानसे लाल ब्लँकेट पांघरले.

त्याने झेब्राच्या डोक्यावर थोपटले आणि म्हणाला, “*टोला पोला*, तू खूप सुंदर नृत्य केलंस.”

हे दृश्य पाहून गाढवाचे डोळे विस्फारले.



गाढवाकडे पाहून झेब्रा म्हणाला, “आमच्या तंबूजवळ उभा राहू नकोस. आयुष्य सुखात घालवण्यासाठी, मालकाची माया मिळवण्यासाठी लागणारी पात्रता तुझ्या अंगी नाही बहुधा.”

“काय?” गाढव म्हणाले. आयुष्यात त्याने मालकाकडे कुठलीही तक्रार केली नव्हती.

गर्विष्ठ टोला पोला पुढे म्हणाला, “मला तू एखाद्या बावळट घोड्यासारखा वाटतोस. चल मी निघतो, माझ्या भोजनाची वेळ झाली. माझ्यासाठी छान सोन्याच्या थाळीत भोजन वाढून ठेवलेले असेल.”



गाढवाने मान खाली करून मालकाने वाढून ठेवलेल्या ओटकडे बघितले. पण त्याने त्याला तोंड लावले नाही. झेब्रा बोलला त्यावर तो विचार करू लागला.

प्रथमच गाढवाच्या चेहऱ्यावरचे हासू मावळले.

गाढवाने आपली मान सर्कसच्या तंबूकडून रहदारीच्या रस्त्याकडे वळवली. अनेक लोक रस्त्यावर ये-जा करत होते. पण तिथे उभ्या असलेल्या गाढवाकडे कुणी ढुंकूनही पाहिले नाही.





रस्त्याच्या पलिकडे मुले एका सुंदर घोड्याभोवती गोळा झाली होती. घोडा स्वत:चे कौतुक करून घेण्यात मग्न होता. त्याच्या गळ्यात उत्कृष्ट प्रतीच्या चामड्याचा लगाम होता. त्यावर चांदीची बटणे चमकत होती. घोड्याच्या पाठीवरील खोगीराखाली मखमली ब्लँकेट पांघरले होते. एक मुलगा घोड्याची मालिश करत होता. त्यामुळे घोड्याचे अंग आणखी चमकत होते. मुलांनी घोड्याला साखर खाऊ घातली. घोड्याचे हे आदरातिथ्य पाहून गाढवाला मत्सर वाटू लागला. कुणीतरी आपल्यालाही साखर खाऊ घालावी, किमान आपल्याकडे बघावे असे त्याला वाटू लागले. म्हणून, तो जोरजोरात ओरडू लागला, “हँ हूं, हँ हूं, हँ हूं....”





गाढवाचा आवाज ऐकून घोड्याने वळून त्याच्याकडे पाहिले, “हा विचित्र आवाज तू काढलास का?”

गाढव म्हणाले, “होय, मी गाढव आहे.”

घोड्याने मान हलवली आणि म्हणाला, “तू माकड आहेस! पण माकड तर एवढं मोठं नसतं. तू झेब्रा वाटतोस, पट्टे नसलेला.”

हे ऐकून गाढवाला वाईट वाटले. तो मोठ्याने ओरडला, “तू नीट ऐकलं नाहीस. मी गा-ढ-व आहे. मी तुझ्यासारखाच दिसतो.”

“मला हसू येतंय. तू एखाद्या खुज्या घोड्यासारखा दिसतोयस. पण त्यालासुद्धा तुझ्यासारखे मजेशीर कान नसतात. जाऊदे, तुझं नाव काय?” घोडा म्हणाला.

गाढवाला काही नावबिव नव्हते. घोडा म्हणाला, “यावरून तुझी योग्यता कळते. कुणाला तुझं नावसुद्धा ठेवावसं वाटलं नाही! माझं नाव *रॉबर्ट* आहे. मी लोकांना खूप आवडतो. बरं माकडा, की गाढवा, निघतो मी.”



गाढव खूप उदास झाले. आपले लांब, टोकदार कान खाली लटकवत ते तसेच उभे राहीले, संध्याकाळ होईर्यंत. चिडका-जाड्या मालक परतला. त्याने भरपूर वस्तू खरेदी केल्या होत्या. दोन मुले त्याचे सामान घेऊन त्याच्या मागेमागे चालत होते.



मालकाच्या हातात रंगीबेरंगी कपड्यांच्या दोन जोड्या आणि मोठे बूट होते. एका मुलाकडे सफरचंदाची पिशवी होती. दुसऱ्या मुलाकडे नक्षीदार थाळ्या, कप, ताग आणि बऱ्याच शाली होत्या.



चिडका-जाड्या मालकाने गाढवाचे खाली लटकत असलेले कान पाहिलेच नाहीत. गाढवाने ओट आणि पाणी यांना स्पर्श केला नाही, हेदेखील मालकाच्या लक्षात आले नाही. तो फक्त म्हणाला, “आपण ताबडतोब निघतोय, गाढवा. मध्यरात्रीपर्यंत मला घरी पोहोचायचंय.”

मालकाने आपल्याकडे नजर टाकावी आणि आपण किती निराश आहोत हे त्याला कळावे, म्हणून गाढव हळुवारपणे म्हणाले, “हँ हूं.” पण त्याच्या मनासारखे घडले नाही. दोन मुलांनी पिशव्या उचलून गाढवाच्या पाठीवर दोन बाजूंना अडकवल्या. मालकाने त्याचे कपडे आणि बूट गाढवाच्या पाठीवर ठेवले. मग मालक आणि त्याचे दुःखी गाढव घराच्या दिशेने चालू लागले.






गाढवाची चाल अत्यंत मंद होती. ते खूप गहन विचारांमध्ये हरवले होते. त्याला टोला पोला आठवला. त्याच्या मालकाने त्याच्या डोक्यावर कसे थोपटले, ते आठवले. त्याला झेब्र्याची सोन्याची भोजन थाळी आठवली. तुझ्यासारख्या गाढवाशी मला काही देणेघेणे नाही, हे त्याचे बोल आठवले.



मग गाढवाला तो सुंदर घोडा आठवला. घोड्याने आपल्या भावना कशा दुखावल्या, ते आठवल्यावर गाढवाला राग आला.

गाढव खूप सावकाश चालू लागले. मालकाने एकदोनदा त्याचा लगाम खेचला. मग गाढवाला रॉबर्टचे शब्द आठवले, “तुझं काही नाव ठेवावं, हेसुद्धा कुणाला जरुरी वाटलं नाही.” गाढवाला खूप वाईट वाटले, रागसुद्धा आला. फक्त घोड्याचाच नाही, तर मालकासुद्धा! अर्थात, मालकाने कामाव्यतिरिक्त गाढवाकडे कधीच लक्ष दिले नव्हते, हे खरेच होते.

रागारागात गाढवाने आपला पाय जोरात आपटला. मालकाने त्याच्याकडे बघितले आणि भुवया उंचावल्या. पण गाढवाने त्याच्याकडे पाहिलेच नाही. नजर थेट समोर खिळवून ठेवत तो थांबला.




एव्हाना, ते पर्वतात अतिशय उंचावर असलेल्या रस्त्यावर आले होते आणि काळोख पडू लागला होता.

“चल पुढे!” मालक कठोरपणे म्हणाला.

पण गाढव आपले खूर मातीत घट्ट रोवून उभे राहीले. ते एकही इंच पुढे सरकले नाही.

“पुढे चल!” पुन्हा एकदा मालक गरजला. त्याने गाढवाचा लगाम जोरात खेचला. पण गाढव काही हलले नाही. मग मालकाने झाडाची एक फांदी तोडून आणली आणि गाढवाला झोडपू लागला.



यामुळे गाढव अधिकच हट्टी बनले. ते रस्त्याच्या मध्यभागी मागच्या पायांवर खाली बसले. त्यामुळे सफरचंदाची पिशवी मागच्यामागे खाली पडली. मालकाने सफरचंद पकडण्याचा प्रयत्न केला. पण तो खूप खुजा, जाडा आणि सुस्त होता. त्यामुळे बरीचशं फळे घरंगळत खाली दरीत पडली.

मालकाला गाढवाचा खूप राग आला.

“अरे, अडाणी गाढवा, नीच जनावरा, थांब घरी पोहोचल्यावर पाहातोच तुला.”


पण गाढव काही जागचे हलले नाही.

जणू काही ते जमिनीला घट्ट चिकटून बसले होते.



कित्येक तास निघून गेले. आभाळात चंद्राचे तेज वाढू लागले. मध्यरात्र होत आली. चिडका-जाड्या मालक गाढवाला ओरडून ओरडून थकला. थकूनभागून तो एका दगडावर बसला. गाढव थोड्याशा मायेसाठी हपापले होते.

मालकाकडे पाहून ते मंद स्वरात म्हणाले, “हँ हूं, हँ हूं!” मालकाला गाढवाचा दु:खी स्वर जाणवला. त्याने गाढवाशी प्रेमाने बोलायचे ठरवले.



मालक उठून गाढवाजवळ गेला. गाढवाच्या पाठीवर हळूवार थोपटून तो म्हणाला, “काय झालं, गाढवा?” गाढव खाली बघून ओरडू लागले. मालकाने गाढवाच्या कानामागे खाजवले. गाढवाने डोळे मिचकावले. मग मालकाने त्याचे नाक खाजवले. गाढव मान डोलवू लागले. मालकाने कोटातून थोडी साखर काढून गाढवाला खायला दिली.



“हँ हूं, हँ हूं!” गाढव अत्यंत आनंदाने रेकू लागले. त्याचे कान सरळ उभे राहीले.

शेवटी मालक म्हणाला, “चल माझ्या मंदगती गाढवा. घरी जाऊया.” गाढवाला अत्यानंद झाला. त्याला नावही मिळाले होते – *मंदगती!* त्वरीत उडी मारून ते उभे राहीले. मालकाकडे पाहून ते मंदपणे हसले आणि पुन्हा दुडक्या चालीने चालू लागले.



पुढच्या दिवशी सकाळी ते घरी पोहोचले. मालक एक धडा शिकले. गाढवाने पुन्हा हट्ट करू नये म्हणून, आपल्याला त्याच्याशी मायेने वागले पाहीजे, याची जाणीव त्याला झाली. जेव्हा जेव्हा मंदगतीकडे तो लक्ष देत नसे, तेव्हा तेव्हा गाढव पुन्हा हट्टी बनत असे.



ही एका हट्टी गाढवाची गोष्ट आहे. यापुढे कुणी *गाढवासारखा हट्टी* हे शब्द उच्चारले, तर तुम्हाला सहज समजेल. हट्टी व्यक्तिचे वर्तन सुधारण्यासाठी त्याच्याशी प्रेमानेच वागले पाहिजे.

E·N·D

समाप्त